ISSN 2320 - 0197

विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३४
(जानेवारी-जून २०१३ / खंड ६, अंक १)


- महाराष्ट्राच्या शिक्षणाची दशा आणि दिशा
- बेसल – ।।। ची नियमावली व भारतीय अधिकोषण क्षेत्राची स्थिती
- आजचा मुक्त व्यापार आणि विकसित देश – मतितार्थ प्रा. भगवतींच्या विवेचनाचा


## महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेची ५० वर्षे


- Historical Perspective of Panchayat Raj
- महाराष्ट्रातील पंचायत राजव्यवस्थेच्या संदर्भातील विविध समित्यांच्या अहवालाचा आढावा
- महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची आर्थिक सद्य:स्थिती
- पंचायत राज आणि कृषी विकास (विशेष संदर्भ : यवतमाळ जिल्हा)
- महाराष्ट्राचा पंचायत राज व्यवस्था व ग्रामीण विकास
- Panchayat Raj Institutions and Primary Education in Maharashtra

- ग्रंथ परिचय
- ३६ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल

विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेची
संशोधन पत्रिका

# अर्थमीमांसा

भारतीय सौर शके १९३४

(जानेवारी-जून २०१३/ खंड ६, अंक १)

❑ प्रमुख संपादक ❑
दि.व्यं.जहागिरदार

❑ सल्लागार मंडळ ❑
श्रीनिवास खांदेवाले
राजेंद्र गव्हाळे
आर.बी.भांडवलकर
एच्.ए.हुद्दा

❑ संपादकीय पत्रव्यवहार ❑
दि. व्यं. जहागिरदार
''व्यंकटेश'', १२, गुलमोहर कॉलनी,
कॅम्प, अमरावती – ४४४ ६०२
दूरध्वनी (०७२१)–२६६१८५१

## – अनुक्रमणिका –

■ महाराष्ट्राच्या शिक्षणाची दशा आणि दिशा
– आर. जी. टाले..............१

■ बेसल – ।।। ची नियमावली व भारतीय अधिकोषण क्षेत्राची स्थिती
– विजय र. रोटे .............४

■ आजचा मुक्त व्यापार आणि विकसित देश – मतितार्थ प्रा. भगवतींच्या विवेचनाचा
– मुक्ता जहागिरदार..........१४

*महाराष्ट्रातील पंचायत राज व्यवस्थेची ५० वर्षे*

■ Historical Perspective of Panchayat Raj
- H.A. Hudda and P.K. Lakhe ....२८

■ महाराष्ट्रातील पंचायत राजव्यवस्थेच्या संदर्भातील विविध समित्यांच्या अहवालाचा आढावा
– कुमुदिनी भा.जोगी ........३४

■ महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची आर्थिक सद्य:स्थिती
– सुलोचना कृ. मानकर.......४६

■ पंचायत राज आणि कृषी विकास (विशेष संदर्भ : यवतमाळ जिल्हा)
– आर.बी. भांडवलकर.......५५

■ महाराष्ट्राची पंचायत राज व्यवस्था व ग्रामीण विकास
– निवृत्ती पिस्तुलकर.........६१

■ Panchayat Raj Institutions and Primary Education in Maharashtra
- R.Y. Mahore ............६६

* ग्रंथ परिचय *

■ महाराष्ट्र : ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा
– राजश्री काशीकर ..........८०

■ ३६ व्या वार्षिक अधिवेशनाचा अहवाल ..........८३

# विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषद कार्यकारिणी

(२०१२-१३)

❑ कार्याध्यक्ष

डॉ. मुक्ता जहागिरदार

❑ अध्यक्ष

डॉ. आर.आर. गव्हाळे

❑ उपाध्यक्ष

डॉ. एस.बी.कटमुसरे

❑ कोषाध्यक्ष

डॉ. गौतम कांबळे

❑ सचिव

डॉ. एच्.ए.हुद्दा (नागपूर परिक्षेत्र)

डॉ.आर.बी.भांडवलकर (अमरावती परिक्षेत्र)

❑ प्रमुख संपादक – 'अर्थमीमांसा'

डॉ. वि.व्यं. जहागिरदार

❑ जिल्हानिहाय प्रतिनिधी :

प्रा. देवेंद्र रंगाचार्य (अमरावती)

डॉ. संतोष कुटे (बुलढाणा)

प्रा.प्रकाश तितरे (चंद्रपूर)

प्रा. पंढरीनाथ बरडे (गडचिरोली)

प्रा. श्रीकृष्ण बोदे (वर्धा)

डॉ. ज्योत्सना देशपांडे (नागपूर शहर)

प्रा. विनोद बागवाले (नागपूर ग्रामीण)

प्रा.विलास गजभिये (गोंदिया/भंडारा)

प्रा. माधुरी राखुंडे (यवतमाळ)

प्रा.लक्ष्मण पाटणकर (वाशीम)

❑ अक्षर जुळवणी व मुद्रक :

कॉम्प्यूटर-नेटवर्क (नरेंद्र पांढरीकर)

अमरावती. मो. ९८५०२८३२४६

**स्वागत मूल्य :**

१) परिषद सदस्य – १०० रू.

२) शैक्षणिक संस्था – १५० रू.

# संपादकीय .....

'अर्थमीमांसा' खंड ६, अंक १ आपल्या हाती देताना मला आनंद होत आहे. विशेष म्हणजे या अंकापासून अर्थमीमांसा या संशोधन पत्रिकेस ISSN क्रमांक प्राप्त झाला आहे. विदर्भ विद्यापीठ अर्थशास्त्र शिक्षक परिषदेचे माजी कार्याध्यक्ष व अध्यक्ष तसेच वर्तमान कार्याध्यक्ष, अध्यक्ष आणि कार्यकारिणीचे सदस्य तसेच परिषदेच्या सर्व आजीवन सदस्यांच्या पाठिंब्यामुळे व त्यांच्या सद्‌भावनांमुळे हा अंक सिद्ध होऊ शकला याची मला पूर्णत: जाणीव आहे. हा अंक वसंतराव नाईक शासकीय कला व सामाजिक शास्त्रे संस्था नागपूर येथे परिषदेच्या ३७ व्या वार्षिक अधिवेशनात (दि. ९ व १० फेब्रुवारी २०१३) विमोचित होत आहे ही बाब आपणा सर्वांना सुखावह आहे. पूर्वीच्या अंकाप्रमाणे हा अंकही सर्वांना आवडेल असा विश्वास वाटतो.

सदर अंकात ३६ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षांच्या भाषणाचा थोडक्यात गोषवारा दिला आहे. 'बेसल-III ची नियमावली व भारतीय अधिकोषण क्षेत्राची स्थिती' या लेखात प्रा. विजय रोटे यांनी बेसल-III च्या नियमावलींमधील विविध बाबींचे शास्त्रीय पद्धतीने स्पष्टीकरण करून भारतातील अधिकोषण क्षेत्राची त्या संदर्भातील स्थिती देखील स्पष्ट केली आहे. जागतिक वित्तीय संकटाच्या पार्श्वभूमीवर बेसल चा आराखडा तयार झाल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. डॉ. मुक्ता जहागिरदार यांनी प्रा. जगदीश भगवती लिखित 'Fair Trade Theory' या गाजलेल्या पुस्तकातील 'मुक्त व्यापाराचे जे वर्तमान स्वरूप' आहे त्याचे विश्लेषण केले आहे. विकसित देशांनी घातलेल्या अटींमुळे मुक्त व्यापार हा विरूपीत झाला आहे.

इ.स. १९६२ मध्ये महाराष्ट्रात पंचायत राज व्यवस्था सुरू झाली. या घटनेला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने पंचायत राज व्यवस्थेचा काही पैलूंवर सहा लेख या अंकात प्रसिद्ध केले आहेत. अर्थात सर्व पैलूंचा यात अन्तर्भाव झाला आहे असे नाही. उदा. पंचायत राज व स्त्री सक्षमीकरण. हुद्दा आणि लाखे यांनी संयुक्तपणे लिहलेल्या 'Historical Perspective of Panchayat Raj' या लेखात पंचायत राज्य व्यवस्थेच्या निर्मितीचा ऐतिहासिक आढावा घेतला आहे तर कुमुदिनी जोगी यांनी 'विविध समित्यांच्या अहवालांचा' सविस्तरपणे काळजीपूर्वक आढावा या संदर्भात घेतला आहे. 'महाराष्ट्रातील जिल्हा परिषदांची आर्थिक सद्य:स्थिती या लेखात सुलोचना मानकर यांनी पंचायत राज व्यवस्थेची संरचना स्पष्ट करून जिल्हा परिषदांच्या प्राप्ती व खर्चाचे गेल्या पाच वर्षातील स्थितीचे विवेचन करून जिल्हा परिषद उत्पन्नासाठी राज्य सरकारांवरच अजूनही अवलंबून आहेत हा महत्त्वाचा निष्कर्ष अधोरेखित केला आहे. आर.बी.भांडवलकरांनी 'पंचायत

राज व कृषी विकासाचे यवतमाळ जिल्ह्याच्या संदर्भात' स्पष्टीकरण करून या व्यवस्थेत शेती विकासाकडे दुर्लक्ष झाल्याचे म्हटले आहे. प्रा. निवृत्ती पिस्तुलकरांनी 'महाराष्ट्र पंचायत राज व्यवस्था व ग्रामीण विकास' या लेखात ग्रामीण विकासाला पंचायत राज व्यवस्था चालना देत असल्याचे मत मांडले आहे. डॉ. आर.वाय.माहोरे यांनी पंचायत राज व्यवस्थेत, जिल्हा परिषदा व प्राथमिक शिक्षण यांच्या बाबत विविध मुद्यांच्या द्वारा विवेचन करून प्राथमिक शिक्षणाचा दर्जा घसरत असल्याचे मत मांडले आहे.

या अंकात 'महाराष्ट्र : ५० वर्षातील आर्थिक विकासाचा धांडोळा' या ग्रंथाचा परिचय प्रा. राजश्री काशीकर यांनी करून दिला आहे. हा ग्रंथ डॉ. दि.व्यं. जहागिरदार यांनी संपादित केला असून त्यात विविध विषयांवर एकूण १८ लेख आहेत. गेल्या वर्षी शेंदूरजना आढाव (जि.वाशिम) येथे झालेल्या ३६ व्या वार्षिक अधिवेशनाच्या वृत्तांत सचिवांनी सादर केला आहे.

अर्थमीमांसेचे वर्षभरात दोन अंक निघावेत ही इच्छा अजूनही आर्थिक कारणास्तव पूर्ण झाली नाही. त्यासाठी आर्थिक आधार वाढविला पाहिजे. सदस्यांनी अर्थमीमांसेसाठी जाहिराती गोळा करणे, देणगी देणे, अर्थमीमांसेची विक्री आपल्या परिसरातील महाविद्यालयांच्या ग्रंथालयात करणे इ. उपाय केले पाहिजेत. या दृष्टीने कार्यकारिणी सदस्य व अन्य आजीवन सदस्य प्रयत्न करतील अशी अपेक्षा आहे.

अर्थमीमांसेसाठी दर्जेदार लेखांची अपेक्षा असते. नवीन लेखक अजूनही याबाबतीत पुढे येतांना दिसत नाही. होतकरू लेखकांनी आपला लेख मार्गदर्शकांच्या सहाय्याने तयार करून पाठवावे असे आवाहन या निमित्ताने पुन्हा करीत आहे. आलेले लेख तज्ञांकडून तपासून घेऊन त्यांच्या संमतीने प्रसिद्ध केले तर रेफर्ड जर्नल म्हणून आपल्या अर्थमीमांसेला अधिक प्रतिष्ठा प्राप्त होईल.

हा अंक सिद्ध करताना सर्व लेखकांनी तत्परतेने लेख उपलब्ध करून दिलेत त्याबद्दल सर्वांचे आभार. तसेच ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केली त्या सर्वांचे सहकार्याबद्दल आभार. कॉम्प्यूटर नेटवर्कचे नरेंद्र पांढरीकर यांनी अत्यल्प वेळात हा अंक सुबकपणे तयार करून दिला त्याबद्दल त्यांचेही आभार.

नववर्षाच्या सर्वांना शुभेच्छा !

दिनांक : २६ जानेवारी २०१३
स्थळ : अमरावती.

(दि.व्यं.जहागिरदार)